नमुना नं.८ बाबतची माहिती अद्ययावत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक: स्वामित्व २०२०/प्र.क्र. ८८/पं.रा.-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
मुंबई ४०० ००१.
तारीख: ०४ फेब्रुवारी, २०२१

## परिपत्रक

गाव आणि शहरातील मालमत्तांचे प्रॉपर्टी कार्ड बाबतचे अभिलेख जिल्हा स्तरावर, जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख यांच्या अभिरक्षेत असतात. तालुका स्तरावर याबाबतचे अभिलेख, उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाच्या अभिरक्षेत असतात. कायद्याच्या दृष्टीकोनातून प्रॉपर्टी कार्ड हा गाव व शहरामधील. गावठाणामधील घराबाबतच्या आणि मोकळया जागांच्या मालकी हक्काबाबतचा अधिकार अभिलेख असतो.

२. महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी "स्वामित्व" योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व गावांच्या गावठाणाचा ड्रोनव्दारे मोजमाप सर्वे सुरु करण्यात आला आहे. यामध्ये ग्राम विकास विभाग, जमाबंदी विभाग, महाराष्ट्र शासन आणि सर्वे ऑफ इंडिया, केंद्र शासन यांच्या संयुक्त सहभागाने गावठाणाचा सर्वे करुन सर्व मिळकतधारकांना त्यांचे कायदेशीर सनद (प्रॉपर्टी कार्ड) उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

३. उपरोक्त कार्यवाहीसाठी ग्रामपंचायतींनी त्यांचेकडील आकारणी यादी (नमुना नं.८) इ-ग्राम सॉफ्ट या संगणक प्रणालीवर अचूक अपलोड करुन तो डाटा तालुका भूमी अभिलेख कार्यालयाकडे देण्यात येणार आहे. ग्रामपंचायतींनी संगणक प्रणालीवर अपलोड केलेला नमुना नं.८ चा डाटा योग्य व अचूक असल्याबाबतची खात्री तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांनी करावी. इ-ग्राम सॉफ्ट या संगणक प्रणालीवरील नमुना नं.८ चा डाटा प्रोसेसींग करुन एन.आय.सी. मार्फत भुमी अभिलेख विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला जात आहे. त्यामुळे यापूर्वीच्या ग्राम विकास विभागाकडील परिपत्रकातील सूचनांप्रमाणे नमुना नं.८ मधील मिळकत क्रमांक,

मालकाचे नाव/ नावे, मिळकतीचे लांबी x रुंदीसह क्षेत्रफळ इ. माहिती अचूक असल्याची खात्री करावी. सर्व मिळकतधारकांचे विशेषत: गावाबाहेर राहणा-या गावातील मिळकत धारकांचे मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आणि राहण्याचा पत्ता इ. ग्राम सॉफ्ट या संगणक प्रणालीवर भरावेत आणि त्याची हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी तालुका भुमी अभिलेख यांनाही सादर करावी. सदरची मोहीम १५ दिवसांत राबवून इ-ग्राम सॉफ्ट या संगणक प्रणालीवरील डाटा अद्यावत करण्यात यावा.

४. विशेषत: ज्या जिल्हयामध्ये ड्रोनव्दारे सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे, त्या जिल्हयांतील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत संबंधितांमार्फत कार्यवाही तात्काळ पूर्ण करुन घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**सुहास जाधवर**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे,
२. सर्व विभागीय आयुक्त,
३. सर्व जिल्हाधिकारी,
४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
५. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद,
६. निवडनस्ती (कार्यासन पंचायत राज-४)